# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक १६.०७.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १४/०७/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १६४ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,२४,०००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळवणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि. १६/०७/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे आ.बाळापुर व पोस्टे गोरेगाव येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व एक मोबाईल व नगदी रू. असा एकुण ७,५७०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १५/०७/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०७ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**अवैधरित्या रेती वाहतुक करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—** मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १५/०७/२०२२ रोजी अवैधरित्या रेती वाहतुक करणाऱ्यांविरूध्द पोस्टे हिंगाली ग्रा. व पोस्टे वसमत शहर येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०२ वाहनांवर कलम ३७९,३४ भादवी सह कलम ४८(७)(८) म.ज.म.अ. कारवाई करून एकुण ८,८५,००० रूपयांचा मुददेमाल ताब्यात घेण्यात आला.